**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.३ चा शपथपूर्वक जबाब**
**मी शपथेवर सत्य कथन करतो की,**

**माझे नाव – गणेश शंकर जाधव,**
**वय –** ४८ वर्षे, व्यवसाय– खाजगी नोकरी,
**राहणार –** लोणी बुद्रुक, ता.राहाता, जि.अहमदनगर.

---

**सरतपास– अभियोगपक्षातर्फे श्री. जी. व्ही. बोर्डे,विद्वान विशेष सहायक सरकारी अभियोक्ता यांच्यातर्फे**

दिनांक ०६/०२/२०१९ रोजी संध्याकाळी ०७.०० ते ०८.०० च्या दरम्यान मी पी. एम. टी हॉस्पीटल येथे डब्बा घेऊन जात होतो. मी जनसेवा फाऊंडेशनच्या जवळ असताना लोणी संगमनेर रोडवर एका मोपेडजवळ मुलगा व त्याचे वडील रस्त्याच्या कडेला उभे होते. त्यावेळी एका मोटारसायकलने त्यांना जोराची धडक दिली. सदर घटना मी स्वतः पाहिली आहे. सदर धडक देणाऱ्या इसमाचे आडनाव शिंदे असे असल्याचे मला समजले. सदर इसमाकडे बजाज कंपनीची मोटारसायकल होती. सदर घटनेमध्ये धडक देणाऱ्या इसमाची चुक होती. मी सदर धडक देणाऱ्या इसमास पाहिल्यास ओळखू शकतो. सदर इसम आज रोजी न्यायालय कक्षात हजर आहे. पोलीसांनी माझेकडे एक ते दिड महिन्यांनी जबाब नोंदविला होता.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास आरोपीतर्फे विद्वान विधिज्ञ श्री. बी. टी. पठारे यांच्यातर्फे –**

**२.** माझे शिक्षण केमिकल इंजिनियरिंग झाले आहे. हे म्हणणे खरे नाही की, घटनेच्या वेळी नमुद जखमी हे मुलाला घटनास्थळावर ठेऊन पेट्रोल आणायला गेले होते. घटनास्थळ हे पी.एम.टी हॉस्पीटलच्या गेटच्या पूर्वेकडे २०० ते २५० फुट अंतरावर आहे. तसेच, सदर घटनास्थळ हे डांबरी रस्त्याच्या उत्तर दिशेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळावरील रस्ता पूर्व पश्चिम असा आहे. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळाजवळ स्पीड ब्रेकर कोठेही नाही. हे म्हणणे खरे आहे की, लोणी संगमनेर रस्ता हा घटनास्थळाजवळ डाव्या बाजूला ३० फुट व उजव्या बाजूला ३० फुट असून रस्त्यामध्ये दुभाजक आहे. घटनास्थळाच्या दक्षिणेला दुकाने आहेत.

**३.** हे म्हणणे खरे आहे की, तेथे नेहमी वर्दळ असते. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळाच्या उत्तरेस दुकानांची भरपूर गाळे आहेत. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळ

हे दुभाजकापासून ५ फुट अंतरावर आहे. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळापासून ३०० फुट पश्चिमेकडे गेल्यानंतर मुसळे वस्तीकडे जाण्यासाठी रस्ता आहे. हे म्हणणे खरे आहे की, जनसेवा फाऊंडेशन जवळ रोडलगत भिंत असल्यामुळे तेथे एकही दुकान नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदर भिंत ही पूर्व पश्चिम अशी १००० फुट आहे.

**४.** मी पोलीसांना जबाब देताना असे सांगितले होते की, दिनांक ०६/०२/२०१९ रोजी संध्याकाळी ०७.०० ते ०८.०० च्या दरम्यान मी पी. एम. टी हॉस्पीटल येथे डब्बा घेऊन जात होतो. सदर बाब माझ्या जबाबामध्ये का नमुद नाही याचे कारण मी सांगु शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी नमुद मुलगा व त्याचे वडीलांना ओळखतो. हे मला माहित नाही की, नमुद मुलाकडे वाहन चालविण्याचा परवाना होता किंवा कसे. हे म्हणणे खरे नाही की, घटनेच्या वेळी सदर मुलगा हा त्याचे वडीलांना घेऊन त्याचे वाहन भरधाव वेगात चालवित होता व त्यामध्ये त्यांचा अपघात झाला.

**५.** माझा जबाब कोणत्या पोलीसांना घेतला होता त्यांचे नाव मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी सदर मुलगा व त्याचे वडीलांना ओळखत असल्याचे त्यांना मदत होण्यासाठी मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीला आज रोजी प्रथमच पाहत आहे. हे म्हणणे खरे नाही की, घटनेनंतर माझी व आरोपीची भेट पोलीस स्टेशनला झाली होती. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला पाहण्याचा माझा कधी योग आला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास काही नाही.**

**साक्षीदार मुक्त.**

दिनांक – ०८/०६/२०२६

माझे समक्ष

PRASAD SHANKARRAO GIRGAONKAR
Digitally signed by PRASAD SHANKARRAO GIRGAONKAR
Date: 2026.06.08 16:28:52 +0530

(प्र. शं. गिरगांवकर)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
(न्यायालय क्र.३), राहाता.

श्रवणोत्तर स्वीकृती

PRASAD SHANKARRAO GIRGAONKAR
Digitally signed by PRASAD SHANKARRAO GIRGAONKAR
Date: 2026.06.08 16:28:45 +0530

(प्र. शं. गिरगांवकर)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
(न्यायालय क्र.३), राहाता.